पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 28/01/2020 (मंगळवार)

(दुपार)

---

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मौजा शिंगारखेडा शिवार येथे दिनांक 23/01/2020 चे 12.00 वा. दरम्यान सौ. चंद्रकला जनार्धन बोरडे, वय 50 वर्ष, रा. शिंगारखेडा तह. नरखेड यांनी अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा प्रभाकर घोरमाडे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई चव्हाण हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर विशाखा कंपनी समोर मारोडी शिवार मौदा येथे दिनांक 26/01/2020 चे 14.30 वा. दरम्यान एमएच–04/एचडी–1544 क्रमांकाच्या टॅक्रचा चालक आरोपीने स्वतःचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–36/एडी–3629 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– जितेन्द्र सोपान बोन्द्र, वय 29 वर्ष, रा. चिचखेडा मोहाडी, भंडारा यांचा जागीच मृत्यू झाला. तर मागे बसलेले विशाल राधश्याम पडोळे, रा. चिचखेडा मोहाडी, भंडारा हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी भंडारा येथील शासकीय दवाखान्यात भरती केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ओमप्रकाश सोपान बोंन्द्र, 35 रा. चिचखेडा मोहाडी, भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरूध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सायक पोलिस निरीक्षक श्री मंगेश काळे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर